नवी आशा नवी दिशा
# सार्वमत



## प्रीतिसुधाजी संकुलात भाऊ थोरातांचे आज व्याख्यान

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** राहाता येथील प्रितिसुधाजी शैक्षणिक संकुलात संस्थापक प्राचार्य दिवंगत इंद्रभान डांगे यांच्या जयंतीनिमित्त आज गुरुवारी सकाळी ९.३० ते ११.३० या वेळेत साहित्यिक, व्याख्याते भाऊ थोरात यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य ज्ञानेश इंद्रभान डांगे यांनी केले आहे.

## घोडेगावात कांदा तीन हजारांपर्यंत

**नेवासा (प्रतिनिधी)–** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या घोडेगाव कांदा मार्केटमध्ये शनिवारी कांद्याची ६६ हजार ९८९ गोण्या आवक झाली. भाव जास्तीत जास्त तीन हजारांपर्यंत निघाले. एक–दोन लॉटला ३००० ते ३१०० रुपये, मोठ्या कांद्याला २७०० ते २९०० रुपये, मुक्कल भारी २५०० ते २७०० रुपये, गोल्टा २३०० ते २६०० रुपये, गोल्टी २००० ते २४०० रुपये, हलका डॅमेज व जोड कांद्याला १००० ते १४०० रुपये भाव मिळाला.



## महत्त्वाचे

### उमेदवारी रद्द, पुन्हा परीक्षाही देता येणार नाही




**मुंबई–** वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांना मोठा धक्का बसला आहे. यूपीएससीने त्यांची उमेदवारी रद्द केली आहे. तसेच यूपीएससीने पूजा खेडकर यांना भविष्यातील सर्व परीक्षा आणि निवडीमधून काढून टाकले आहे. पूजा खेडकर यांनी नियमांचे उल्लंघन केल्याचं आणि त्यामध्ये त्या दोषी आढळल्यामुळे त्यांच्यावर ही मोठी कारवाई करण्यात आली आहे. पूजा खेडकर यांना यूपीएससीकडून दोषीकरार देण्यात आला आहे. नागरी सेवा परीक्षा नियम २०२२ नुसार दोषी ठरवण्यात आलं आहे. पूजा खेडकर यांची उमेदवारी रद्द करण्यात आली आहे. विशेष म्हणजे पूजा खेडकर यांच्या बाजूने काल कोर्टात युक्तिवाद करण्यात आला होता की, अजून यूपीएससीने दोषी ठरवलेले नाही. यूपीएससीकडून दुपारपर्यंत तिचं म्हणणं मांडायला वेळ देण्यात आला होता. अखेर यूपीएससीने पूजा खेडकर यांच्यावर कडक कारवाई केली आहे. यूपीएससीने अधिकृतपणे प्रेसनोट काढत पूजा खेडकर यांच्यावर कारवाई केल्याची माहिती दिली आहे.

### कोपरगावात अज्ञात वाहनाच्या धडकेत भाविकाचा मृत्यू

**कोपरगाव (तालुका प्रतिनिधी)–** येथील राष्ट्रसंत जनार्दन स्वामी महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेऊन वैजापूरकडे जाणार्‍या भाविकाचा अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी सायंकाळी घडली. बाबासाहेब विष्णू जाधव (वय ४८) असे अपघातात मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. बाबासाहेब जाधव हे ३० जुलै रोजी दुपारी चारच्या सुमारास वैजापूर तालुक्यातील शिवराई येथून दुचाकीवरून कोपरगावला राष्ट्रसंत जनार्दन स्वामी महाराजांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी आले होते. समाधीचे दर्शन घेऊन ते पुणतांबा फाटा मार्गे वैजापूरच्या दिशेने जात असताना कोकमठाण शिवारात त्यांच्या दुचाकीस अज्ञात वाहनाने धडक दिली. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. मृतदेह कोपरगाव येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी आणण्यात आला. याप्रकरणी मृत बाबासाहेब जाधव यांचा भाऊ बाळासाहेब रघुनाथ जाधव यांच्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पो. हे. कॉ. ए. एम. दारकुंडे करीत आहेत.

### मनी लॉँड्रींगप्रकरणी पुणे, बारामतीत छापे

**मुंबई–** ईडीने मनी लॉँड्रींगप्रकरणी महाराष्ट्रातील विविध ठिकाणी धाडी टाकल्या. मुंबई, कर्जत, बारामती आणि पुण्यात ही धाड टाकण्यात आल्याची माहिती आहे. ईडीकडून मनी लॉँड्रींगप्रकरणी पुण्याच्या एम. एस. शिव पार्वती साखर कारखाना आणि इतर कंपन्यांच्या खात्यात पैशांचा गैरव्यवहार झाल्याच्या आरोपाखाली ईडीकडून सर्च ऑपरेशन राबवण्यात आले. एम/एस. हायटेक इंजीनियरिंग कॉर्पोरेशन इंडिया प्रा.लि. आणि त्यांचे व्यवस्थापक नंदकुमार तासगावकर, संजय आवटे आणि राजेंद्र इंगवाले यांच्या बँक लोन फसवणूकप्रकरणी हे अभियान राबवण्यात आले आहे. ईडीच्या या छापेमारीत अनेक संशयास्पद कागदपत्र, डिजिटल पुरावे आणि १९.५० लाख रुपये जप्त करण्यात आले आहेत. सीबीआयने या प्रकरणात सर्व प्रथम गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्यांच्या आधारे ईडीने पुढे तपास सुरू केला आहे. या कंपन्यांनी १०० कोटीचे कर्ज घेतले होते. मात्र, कर्ज मिळवण्याच्या अटीनुसार प्रकल्पासाठी ७१ कोटी रुपये दिले नाहीत, असे ईडीच्या तपासात समोर आले आहे. तसेच, कर्ज स्वरुपात घेतलेली रक्कम इतर कंपन्यांच्या खात्यात वळती करण्यात आली आहे. त्यानुसार ईडीकडून पुढील तपास केला जात आहे.

# कामिका एकादशीनिमित्त नेवाशात लाखो भाविकांकडून पैस खांबाचे दर्शन





**नेवासा (शहर प्रतिनिधी)–** श्री संत ज्ञानेश्वर माऊलींची कर्मभूमी व ज्ञानेश्वरी ग्रंथाचे रचनास्थान असलेल्या नेवासा येथे बुधवारी आषाढी वद्य (कामिका) एकादशीच्या निमित्ताने मोठी यात्रा भरली होती. पैस खांबाचे दिवसभरात लाखो भाविकांनी दर्शन घेतले. 'पुंडलीक वरदे...हरि विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम', 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'च्या जयघोषाने नेवासे नगरी दुमदुमली होती. यावेळी शेकडो दिंड्यांनी माऊलींचा गजर करत हजेरी लावली होती.

पहाटे ४ च्या सुमारास संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पैस खांबास वेदमंत्राचा जयघोष करत संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे देविदास महाराज म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत मुळा एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष उदयन गडाख व डॉ. निवेदिता गडाख यांच्याहस्ते अभिषेक करण्यात आला.पौरोहित्य वरखेड येथील प्रशांत भालेराव यांनी केले. श्रीक्षेत्र देवगड संस्थानचे भास्करगिरी महाराज, प्रकाशानंदगिरी महाराज, उद्धव महाराज मंडलिक, आमदार शंकरराव गडाख, माजी आमदार संभाजीराव फाटके, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विठ्ठलराव लंघे, भगवान महाराज जंगले, नंदकिशोर महाराज खरात, ज्ञानेश्वर महाराज तांबे यांनी यावेळी भेट देऊन माऊलींच्या पैसखांबाचे दर्शन घेतले. आलेल्या सर्व मान्यवर व भाविकांचे संस्थानच्या विश्वस्त मंडळींसह स्वयंसेवकांनी स्वागत केले.

मंदिर प्रांगणाच्या बाहेर दर्शनबारी रांगेसह मुखदर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती. एक किलोमीटर अंतरापर्यंत दर्शन बारीची रांग लागली होती. तर मंदिर प्रांगणात आमदार शंकरराव गडाख मित्रमंडळ, पंचगंगा सिड्स कंपनी, तर मंदिर रस्त्यावर रविराज तलवार यांच्यावतीने आलेल्या भाविकांसाठी शाबुदाना खिचडी प्रसादाचे वाटप करण्यात आले. सुनीताताई गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली आलेल्या प्रत्येक महिलेला कृष्ण तुळशी रोपांचे वाटप करण्यात आले. ज्ञानोदय शाळेजवळ माऊली मित्र मंडळाच्यावतीने उकडलेले शेंगदाणे, संत नरहरी सोनार मंदिर येथे मसाला दूध, घुले पाटील पतसंस्थेच्यावतीने केळी, पाणी, त्रिमूर्ती युवा प्रतिष्ठानकडून राजगीरा लाडू वाटप केले. रविराज तलवार यांच्यावतीने खिचडी, जय महाराष्ट्र हॉटेल पिण्याचे पाणी, मराठी मुलांची शाळा येथे चहा पाणी वाटप, तसेच मंदिर मार्गावर अनेक सामाजिक मंडळांनी केळी व फराळाचे वाटप केले. श्री मोहिनीराज मंदिर प्रांगणात ब्राह्मण सभेच्यावतीने पिण्याचे पाणी, चहा, फराळ भाविकांना देण्यात आला. नेवासा बुद्रुक येथील युवकांच्यावतीने चहाचे, तर नेवासा बुद्रुक येथील शिवांश इंडस्ट्रीजच्या वतीने ५१ हजार पाणी बॉटलचे वाटप करण्यात आले. पोलीस दलाच्यावतीने पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली चौका–चौकांत बंदोबस्त ठेवण्यात आला होता. रस्त्यात फळ विक्री करणार्‍या विक्रेत्यांना रस्त्याच्या कडेला दुकाने लावण्यासाठी सोय करण्यात आली होती. त्यामुळे भाविकांना मार्ग सुकर होत होता. एसटी स्टँड, मराठी शाळा, मार्केट कमिटीच्या प्रांगणात वाहन पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती. चारचाकी वाहनांसाठी नेवासा बुद्रुक येथून येणार्‍या भाविकांसाठी विश्वेश्वर नाथबाबा विद्यालय प्रांगणात वाहन पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती. पैसखांब मंदिरासह मंदिराचे निर्माते वैकुंठवाशी बन्सी महाराज तांबे यांच्या समाधी मंदिरावर केलेली विद्युत रोषणाई आकर्षण ठरली होती. आषाढी वद्य एकादशी ही माऊलींची एकादशी असल्याने नेवासा शहरासह संत ज्ञानेश्वर मंदिर रस्ते गर्दीने फुलून गेले होते. श्री मोहिनीराज मंदिरात भगवान श्री मोहिनीराजाचे भाविकांनी दर्शन घेतले.

- नेवासा तालुक्यासह राहुरी, श्रीरामपूर, शेवगाव या भागातील शेकडो दिंड्यांनी येथे 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'चा गजर करत हजेरी लावली. मंदिर देवस्थानचे देविदास महाराज म्हस्के व विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग अभंग यांच्यासह विश्वस्त मंडळाने स्वागत करून श्रीफळ प्रसाद देऊन सन्मान केला.

- नेवासा एसटी स्टँडपासून ते ज्ञानेश्वर महाराज मंदिरापर्यंतच्या एक किलोमीटर अंतरावर गृहोपयोगी वस्तू, खेळणी, मिठाई, सौंदर्य प्रसाधने, कपडे अशा विविध प्रकारचे स्टॉल थाटण्यात आले होते. या स्टॉलवरील साहित्य घेण्यासाठी महिला भाविकांची झुंबड उडाली होती.

## पवार- ठाकरेंचे वक्तव्य दंगली घडविण्यासाठीच- ना. विखे

**अहमदनगर (प्रतिनिधी) –** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संदर्भात उध्दव ठाकरे यांनी केलेले वक्तव्य वैफल्यग्रस्त अवस्थेतील असून, मुख्यमंत्री पदावर राहिलेल्या व्यक्तिला शोभा देणारे नाही. शरद पवार यांच्या पाठोपाठ उध्दव ठाकरेंचे वक्तव्य दंगली घडविण्यासाठी असल्याचा थेट आरोप महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केला. नामांतराच्या संदर्भात झालेली चूक जशी पवारांनी मान्य केली तशीच चूक मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मान्य करावी ,अशी मागणीही मंत्री विखे पाटील यांनी केली.

नगरमध्ये माध्यमांशी बोलताना मंत्री विखे पाटील यांनी उध्दव ठाकरे यांनी फडणवीस यांच्यावर केलेल्या टीकेला उत्तर दिले आहे. ते म्हणाले, मुख्यमंत्री पदावर राहिलेल्या व्यक्तींला असे वक्तव्य शोभा देत नाही. परंतु सत्तेसाठी विचार गमावलेल्यांच्या तोंडी अशीच वक्तव्ये येणार त्यांच्याकडून दुसरी कोणती अपेक्षा नाही. राजकारणात मतभेद असू शकतात पण भावनेच्या भरात आपण काय बोलतो याचे भानही उध्दव ठाकरे यांना राहू नये याचे आश्चर्य वाटते. राज्यात मणिपूरचा संदर्भ देऊन ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केलेले वक्तव्य आणि आता उध्दव ठाकरे यांची भाषा राज्यात दंगली घडविण्यासाठी आहेत का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. राज्यातील सर्व जनता देवेंद्र फडणवीस यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असून, आता राज्यात महायुतीला मिळत असलेला प्रतिसाद पाहता महाविकास आघाडीला यश मिळणार नाही हे लक्षात आल्यानेच आशी वक्तव्ये पुढे येवू लागली असल्याचे विखे पाटील म्हणाले.

मराठा आरक्षणाच्या संदर्भात सुध्दा आघाडीच्या तीनही पक्षाकडून भूमिका स्पष्ट केली जात नाही. काल उध्दव ठाकरे केंद्राकडे बोट दाखवून मोकळे झाले. पण तुम्ही मुख्यमंत्री असताना किंवा शरद पवार मुख्यमंत्री असताना मराठा आरक्षणाच्या संदर्भात काय केले हे एकदा तरी सांगावे असे थेट आव्हान देऊन नामांतराच्या संदर्भात झालेली चूक जशी पवारांनी मान्य केली तशीच चूक मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मान्य करावी, अशी मागणी मंत्री विखे पाटील यांनी केली.

## ब्लाऊज वेळेवर शिवला नाही म्हणून टेलरला १५ हजार रुपयांचा दंड

### मोफत ब्लाऊज शिवून देण्याचीही शिक्षा



**धाराशिव–** ब्लाउज वेळेवर शिवला नाही म्हणून धाराशीवच्या एका महिला टेलरला ग्राहकमंचाने चांगलाच दणका दिला आहे. या महिला टेलरला १५ हजार रुपयांचा दंड ठोठवण्यात आला. तसेच मोफत ब्लाऊज शिवून देण्याची शिक्षा देण्यात आली. सध्या धारशिवमध्ये या प्रकरणाची चांगलीच चर्चा आहे.

ॲडव्हान्स पैसे घेऊनही वेळेत ब्लाऊज शिऊन न दिल्याने धाराशिवच्या टेलर महिलेला तब्बल १५ हजार रुपयांचा दंड ग्राहक तक्रार निवारण मंचने ठोठावला आहे. तसेच राहिलेला ब्लाऊज मोफत शिऊन देण्याची शिक्षाही सुनावली आहे. स्वाती प्रशांत कस्तुरे यांनी जानेवारी २०२३ मध्ये शहरातील नेहा संत या टेलरिंगचे दुकान चालवणार्‍या महिलेकडे वर्कचे दोन ब्लाऊज शिवण्यासाठी दिले होते.

यासाठी एकूण ६ हजार ३०० रुपये बिलापैकी ३ हजार रुपये ॲडव्हान्स दिले होते. नेहा संत यांनी वेळेवर ब्लाऊज शिवून दिला नाही. फोन, मेसेजद्वारे पाठपुरावा केल्यानंतरही ब्लाऊज मिळत नसल्याने २८ एप्रिल २०२३ रोजी कस्तुरे यांनी ॲड.प्रशांत कस्तुरे यांच्यामार्फत ग्राहक तक्रार निवारण मंचात तक्रार दाखल केली.

दरम्यान मंचाने बजावलेल्या नोटिशीला प्रतिसाद न देता नेहा संत या सुनावणीला गैरहजर राहिल्याने १५ जुलै २०२४ रोजी ग्राहक मंचाने एकतर्फी आदेश पारित करीत नेहा संत यांना १० हजार रुपये दंड तसेच तक्रारीचा खर्च म्हणून ५ हजार रुपये स्वाती कस्तुरे यांना देण्याचा आदेश दिला आहे.

## केबल चोरीला गेल्याची दहा शेतकर्‍यांची पोलिसांत तक्रार

### गुन्हेगारांना तात्काळ जेरबंद करण्याची मागणी



**बेलापूर (वार्ताहर)–** बेलापूर खुर्द येथील शेतकर्‍यांच्या विहिरीतील पाण्याच्या इलेक्ट्रिक मोटारींच्या केबलची चोरी झाल्याची तक्रार दहा शेतकर्‍यांनी बेलापूर पोलीस चौकीत दिली असून चोरट्यांचा तात्काळ शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्रस्त शेतकर्‍यांनी केली आहे.

त्या तक्रारीत म्हटले आहे की, आमच्या शेतातील विहिरीत इलेक्ट्रिक मोटारी बसविण्यात आल्या आहेत. या मोटारींची केबल चोरी करण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यात आमच्या केबलची अज्ञात चोरट्यांनी चोरी केली असल्याने मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार आहे. तसेच शेतीची कामेही रखडली आहेत. त्यामुळे या चोरी प्रकरणातील गुन्हेगारांना तात्काळ शोधून त्यांच्यावर कारवाई करावी. येथील शेतकरी चांगदेव महाडिक, वैजयंती राजुळे, केशवराव महाडिक, गोरक्षनाथ सालबंदे, गोरख भगत, एकनाथ भागवत भगत, नवनाथ टाकसाळ, आत्माराम फुंदे, पंडितराव बोंबले आणि मच्छिंद्र येवले यांनी पोलिसांत केबलची चोरी झाल्याची तक्रार दिली आहे. यासंदर्भात सरपंच ॲड.दीपक बारहाते यांच्यासह संतप्त शेतकर्‍यांनी आज बेलापूर पोलिसांना निवेदन देऊन या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

# जायकवाडीचा उपयुक्त साठा ८.२४ टक्क्यांवर

## गोदावरीचा विसर्ग ८४०१, दारणा ५४२२, तर कडवा ४०० क्युसेकवर

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** गोदावरीतून जायकवाडी जलाशयात ६५६७ क्युसेकने पाण्याची आवक काल सायंकाळी ६ वाजता सुरु होती. या जलाशयाचा उपयुक्तसाठा ८.२४ टक्के इतका झाला आहे. नांदूरमधमेश्वर बंधार्‍यातून जायकवाडीच्या दिशेने गोदावरीत ८४०१ क्युसेकने विसर्ग सुरू आहे.

जायकवाडीत काल सायंकाळी उपयुक्तसाठा ६.३ टिएमसी इतका झाला. उपयुक्तसह मृतसाठा ३२.३ टिएमसी इतका झाला आहे. या जलाशयात उपयुक्तसाठा ८.२४ टक्के इतका झाला आहे. भंडारदराही ओव्हरफ्लो झाला आहे. यातील पाणी निळवंडेत येऊन निळवंडे भरल्यानंतर ते पाणी प्रवरा नदीतून जायकवाडी जलाशयाकडे धावू लागेल. या धरणात उपयुक्तसाठा ६५ टक्के होणे अपेक्षित आहे. त्यावेळी नगर, नाशिकला पाणी सोडण्याचे टेंशन राहाणार नाही. जोरदार पाऊस लागून राहिल्यास साठा होऊ शकतो. परवा दारणाच्या पाणलोटातील इगतपुरी, घोटी परिसरात पावसाची संततधार सुरू होती. त्यामुळे दारणा धरणात ४६४ दलघफू नवीन पाण्याची आवक झाली. त्यामुळे या धरणातील विसर्ग वाढवत तो काल सकाळी ६७१४ क्युसेकवर नेण्यात आला होता. तो दिवसभर टिकून होता. मात्र आवक कमी झाल्याने दारणाचा विसर्ग काल संध्याकाळी कमी करून ५४२२ क्युसेकवर आणण्यात आला. दारणाचा साठा ८५.३० टक्के इतका आहे. ७१४९ दलघफू क्षमतेच्या या धरणात ६०९८ दलघफू पाणी साठा आहे. या धरणातून काल सकाळी ६ पर्यंत २.६ टिएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे. काल सकाळी ६ पर्यंत दारणा येथे २६ मिमी, घोटी येथे ५६ मिमी तर इगतपुरी येथे ८० मिमी पावसाची नोंद झाली. दारणाच्या दिशेने भाममधून १७९० क्युसेक, भावलीतून २९० क्युसेक विसर्ग येत आहे. कडवातूनही ४०० क्युसेकने विसर्ग दारणाच्या खाली दारणा नदीत दाखल होत आहे. दारणा व मुकणेचा विसर्ग गोदावरीच्या दिशेने नांदूरमधमेश्वर बंधार्‍यात दाखल होत आहे. अन्य धरणांचे साठे असे– मुकणे ३५.७४ टक्के, वाकी ४६.९१ टक्के, भाम व भावली १०० टक्के, कडवा ८५.४३ टक्के. नांदूरमधमेश्वर बंधार्‍यातून जायकवाडीच्या दिशेने गोदावरीत काल ८४०१ क्युसेकने विसर्ग सुरू होता. काल सकाळी ६ वाजता हा विसर्ग ५१७३ क्युसेक होता, तो नंतर ८ वाजता १६१४ क्युसेक ने वाढवून ६७८७ क्युसेक इतका करण्यात आला. तो पुन्हा दोन तासानी सकाळी १० वाजता १६१४ क्युसेकने वाढवून ८४०१ क्युसेकवर स्थिर ठेवण्यात आला. काल सकाळी ६ वाजता १ जूनपासून या बंधार्‍यातून जायकवाडीच्या दिशेने ३.३ टिएमसी पाण्याचा विसर्ग गोदावरीत झाला आहे. गंगापूरच्या पाणलोटात मध्यम स्वरुपाच्या पावसाचे आगमन होत आहे. गंगापूर काल सकाळी ६२.६३ टक्के इतके भरले होते. या धरणाच्या पाणलोटात गंगापूरला २९ मिमी, अंबोलीला ३१ मिमी, त्र्यंबकला २२ मिमी पावसाची नोंद झाली. काल सकाळी संपलेल्या मागील २४ तासांत या धरणात १११ दलघफू नविन पाणी दाखल झाले. गंगापूर समुहातील कश्यपी ३२.०२ टक्क्यांवर, गौतमी गोदावरी ६०.१२ टक्क्यांवर, आळंदी ३०.१५ टक्क्यांवर आहेत.




नवी आशा नवी दिशा सार्वमत

हे दैनिक मुद्रक व प्रकाशक राजेंद्र कृष्णराव सोनवणे यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. एन.११, एम.आय.डी.सी, अहमदनगर येथे मुद्रित करुन प्लॉट क्र. एन. ११, एम.आय.डी.सी, अहमदनगर ४१४१११ येथे प्रसिध्द केले आहे. ● संपादक– ✻ अनंत सा. पाटील : ☎ (०२४२२) २२२४६४,२२२६२९. फॅक्स : २२२७९४. अहमदनगर कार्यालय : ☎ (०२४१) २४३११०३/०४ फॅक्स : (०२४१) २४३११०५. R.N.I Regi. No. 31816/1976. पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. रजि. नं. बी.आय.आय./आर.एन.पी./एस.आर.पी./००३/२०२१–२३ (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे)